# भूमिका

दोन अंकी नाटक

प्रल्हाद जाधव

**पात्र संयोजन:**

सुहास (३० वर्षे)

राघव (२५ वर्षे)

चारू (२१ वर्षे)

प्रवेश पहिला

( मुंबई-पुण्याबाहेरील जिल्ह्याचे एखादे ठिकाण. त्या शहरातील एका निवासी संकुलातील पहिल्या माळ्यावरचा वन बीएचके फ्लॅट. त्यातील हॉल अर्थात् बैठकीची खोली. साधी पण आकर्षक. लागून स्वयंपाकघर. स्वयंपाकघराला खिडकी-पडदा. पडदा सरकवला की बैठकीच्या खोलीतील आणि किचनमधील माणसे एकमेकांशी बोलू शकतात. चहा-कॉफी, खाणे-पिणे  देण्यासाठी तो एक मधला मार्गसुद्धा आहे. एकीकडे बेडरूम. एक छोटी ओपन बाल्कनी. बाल्कनीतून बाहेरचे आकाश दिसते. खालील रहदारीचे आवाज येतात. वरून खालच्या माणसाशी बोलता येते. हॉलमध्ये नेटके सामानसुमान. सोफासेट, टी-पॉय. एकीकडे लिहिण्याचे टेबल. टेबलावर नजरेत भरणारे गजराचे घड्याळ, फोन. रात्रीचे बारा वाजलेत. सुहास राघवची वाट बघत सोफ्यावरच शाल घेऊन पहुडलाय. डोअरबेल वाजू लागते. त्या आवाजाने तो उठतो आणि दरवाजा उघडतो. दारात त्याचा लहान भाऊ राघव उभा-)

सुहास : (थोडा चिडलेला) किती वाजले? ही घरी येण्याची वेळ झाली का?

राघव : आय ॲम सॉरी दादा ! इतक्या रात्री खरं म्हणजे तुला त्रास द्यायला नको होता पण तू वाट बघत बसणार हे माहीत होतं, म्हणून यावंच लागलं. (झोळी सोफ्यावर फेकून देतो आणि बूट काढत) सालं हे पत्रकाराचं आयुष्यच असं. 'या निशा सर्व भूतानां, तस्यां जागर्ती संयमी... (अर्थ स्पष्ट करत) जेव्हा सर्वजण झोपलेले असतात तेव्हा मी जागा असतो... कारण काय? (थांबून) तर मला निद्रानाश झालाय! (हसतो)

सुहास : काल सकाळी आठ वाजता बाहेर गेलाहेस. आता रात्रीचे बारा वाजलेत. एवढ्या वेळात तुला साधा फोनही करता आला नाही?

राघव :  (कपडे बदलत) पोलिस स्टेशन, हॉस्पिटल आणि आमचं ऑफिस अशी भयानक तंगडतोड झाली. त्या पळापळीत मोबाईलपण हरवला कुठंतरी...

(स्वयंपाकघरात पळतो. आतला लाईट लाऊन वॉशबेसीनमध्ये सपासप तोड धुतो. तोवर सुहास त्याचे कपडे व्यवस्थित घडी करून ठेवतोय.)

सुहास : जगाचं भलं करण्याची जबाबदारी आपल्यावरच येऊन पडलेय असं समजू नको राघव.

राघव : ( तोंड पुसत बाहेर येत ) असं जर प्रत्येकजण म्हणायला लागला ना तर जगाचं काय होईल रे दादा?

सुहास : जेवण गरम करू?

राघव : जेवण्याची इच्छा नाही आता. ऑम्लेट-पाव खाल्लाय. स्टेपल फूड ऑफ जर्न्यालिस्ट (हसतो.)

सुहास : मग कॉफी आणू थोडी? थर्मासमध्ये काढून ठेवलीय...

राघव : (हात जोडत) जगातल्या बंधुप्रेमाचा सगळा अर्क काढून तुझी मूर्ती घडवलेय रे दादा देवानं...

सुहास : (तीच संमती समजून आत जायला निघतो. त्याला सोफ्यावर पडलेली झोळी दिसते. ती उचलून विशिष्ट खुंटीवर टांगायला जातो. झोळीतून त्याला कसलासा वास येतो म्हणून तो आत हात घालून जुईच्या फुलांचा गजरा बाहेर काढतो. राघवसमोर धरून-) हे काय?

राघव : काय म्हणजे काय? जुईच्या फुलांचा गजरा. रात्रीच्या वेळेला बसस्टॉपवर गजरे विकणारी पोरं असतात. त्यापैकी एकानं जरा आग्रहच केला. म्हणाला, 'लेलो साब आप बहोत दिलवाले लगते हैं!' आता त्यानं ‘दिला’लाच

हात घातल्यामुळं घेणं भाग पडलं, काय?

सुहास : ब्लडी पोयेट! (म्हणत गजरा त्याच्याकडं फेकतो.)

राघव : (हसत हसत गजरा झेलतो आणि) 'ओ होऽऽऽ क्या बात है! (असे म्हणत' त्याचा सुगंध श्वासात भरुन घेतो.)

सुहास : ( झोळी भिंतीवर कपडे अडकवण्याच्या  हुकात टांगून किचनमध्ये जातो आणि एका मगातून कॉफी घेऊन बाहेर येतो, देत) घे!

राघव : हे काय? मला एकट्यालाच, तुला नाही आणलीस?

सुहास : मला नको.

राघव : थोडी घे!

सुहास : नको.

राघव : अगदी एक घोट ....

सुहास : नको रे बाबा, खरंच नको !

राघव : कमाल करता है यार, अगदी एक घोट तरी घे! (बळेबळे त्याच्या तोंडाला मग लावत घोट घ्यायला लावतो.)

सुहास : न सांगता सवरता, इतका वेळ बाहेर राहत जाऊ नकोस. जीव टांगणीला लागतो माझा. मोबाईल नो-रिप्लाय येत होता, प्रेसमध्ये फोन केला तर कुणालाच काही माहीत नव्हतं... दिवस कसे आलेत माहिताय ना?

राघव : नेमकं हेच सांगणार होतो तुला मी आता.

सुहास : काय?

राघव : दिवस किती वाईट आलेत ते!

सुहास : म्हणजे?

राघव : सकाळी बाहेर पडलो. जे.सी. कॉलेजला जाणारी बस पकडली. तिथं आंतर विभागीय बुद्धीबळ स्पर्धांचं उद्धाटन होणार होतं. करंदीकरांनी मला तो कार्यक्रम कव्हर करायला सांगितलं होतं... वाटेत गांधीचौकात ट्रॅफिक जाम! प्रचंड गर्दी. उतरलो आणि पुढं झालो. पाहतो तर काय ?

सुहास : काय?

राघव : सोळा-सतरा वर्षे वयाच्या एका मुलीचा भर रस्त्यात खून झालेला!

सुहास : काय म्हणतोस काय?

राघव : रामपुरी चाकूनं बारा ठिकाणी भोसकली होती. जागच्या जागी खलास. रक्ताच्या थारोळ्यात पडली होती.

सुहास : माय गॉड! कुणी केलं हे भयानक कृत्य?

राघव : तेच शोधून काढण्यासाठी एवढा वेळ बाहेर राहावं लागलं.

सुहास :  काय नाव त्या मुलीचं?

राघव : अनिता! अनिता शहा– व्यापारी बापाची एकुलती एक मुलगी. सकाळी क्लासला चालली होती. चार गुंडांनी भर रस्त्यात धरली आणि सपासप भोसकून पसार झाले.

सुहास :  बापरे! कुठले होते गुंड? काही पत्ता लागला का?

राघव : आता गुंड म्हणशील तर तीसुद्धा कॉलेजची पोरं...

सुहास : पण त्यानी तिचा खून का करावा?

राघव : खुनाचं कारण अगदी हास्यास्पद आहे. काय, तर म्हणे, ती फार ॲटिट्यूड दाखवायची. चालू भाषेत सांगायचं तर, कुणालाच लाईन देत नव्हती...

सुहास : काय म्हणतोस?

राघव : नाहीतर काय? टुकार हिंदी सिनेमे बघून टाळकी फिरताहेत पोरांची!

सुहास : पण हे तुला कसं समजलं?

राघव : पोलिसस्टेशनपासून हॉस्पिटलपर्यंत भ्रमंती केली. कॉलेजमध्ये गेलो. अनिताच्या घरीही गेलो. तिचे आई - बाबा, मैत्रिणींशी बोललो. त्या चौघांची नावं मिळवली. उद्याच्या अंकात सर्व तपशिलवार प्रसिद्ध होणार आहे.

सुहास : अरे बापरे!

राघव : तुला ताटकळत राहावं लागलं हे खरं पण उद्याचा पेपर वाचलास की सर्व राग पळून जाईल तुझा.

सुहास : त्या गुंडांची नावं छापलीस तू?

राघव : अर्थात् !

सुहास : पण त्यांच्यावरचा गुन्हा शाबीत व्हायला खूप काळ जाईल. आयविटनेस मिळाला नाही तर कदाचित ते निर्दोषही सुटतील.

राघव : दादा मी पूर्णपणे खात्री करून घेतली आणि नंतरच नावं दिलीयत. पत्रकारानं 'इन्स्टंट जस्टीस' करायचा असतो.

सुहास : पण उद्या काही भलतंसलतं झालं तर? तुझ्या बाजूनं किती लोक उभे राहतील? तुझा संपादक– तो करंदीकर तरी तुझी बाजू घेईल असं वाटतं का तुला?

राघव : डोन्ट वरी! तेव्हाचं तेव्हा बघू!

सुहास : भर दिवसा मुडदा पाडणारे ते उलट्या काळजाचे गुंड, उद्या त्यानी तुझं काही बरं- वाईट केलं तर? तुला हजार वेळा सांगितलंय की ही नोकरी सोडून दे आणि दुसरं काहीतरी बघ... पण ऐकतोहेस का तू?

राघव : कमाल झाली ! अरे दिवसा ढवळ्या चार गुंड एका कोवळ्या कळीसारख्या मुलीचा निर्दयपणे खून करतात आणि त्या बातमीचा पाठपुरावा केला तर ती भानगड वाटते तुला? त्या पोरीच्या घरात हाहाकार उडालाय. तिची आई धाय मोकलून रडत होती. स्वतःच्या अंगाखांद्यावर खेळलेली एकुलती एक मुलगी बघता बघता गुंडांच्या विकृतीचा बळी ठरली. तिच्या आई वडिलांना वेड लागायची पाळी आलीय. काय अपराध होता तिचा? कॉलेजात जाणं हा की शालीनपणं वागणं? एक कोवळं, निरपराध आयुष्य आपल्यासमोर मातीमोल होऊन पडतं आणि काहीतरी भानगड मागं लागेल म्हणून आपण गप्प बसायचं? उद्या ती मुलगी कुणाचीतरी पत्नी, कुणाची तरी आई झाली असती!

सुहास : बस बस बस बस... हे रंगभूमीवरचे संवाद चुकून घरात बोलतोहेस तू.

राघव : (हसत) प्रेक्षकात बसण्याच्या ऐवजी तूच चुकून घरात आलाहेस दादा!

(टेबलावरच्या घड्याळाचा गजर होतो. सुहास घड्याळ उचलतो आणि गजर बंद करतो.)

राघव : तुला कितीवेळा सांगितलं की ते जुनं घाणेरडं घड्याळ भंगारमध्ये फेकून दे म्हणून. नको तेव्हा गजर देतं.

सुहास : बाबांची तेवढीच एक आठवण राहिलीय राघव. ह्या घड्याळाच्या रूपानं कोणीतरी वडीलधारं माणूस घरात आहे असं सतत वाटत राहतं... चल झोपायचंय ना तुला? (सोफ्यावरची शाल उचलतो.)

राघव : म्हणजे काय? माझी वाट पाहत तू इथंच झोपला होतास की काय? यू आर ग्रेट यार. असा भाऊ दुनियेत शोधून सापडायचा नाही.

(सुहास हॉलमधील लाईट घालवतो. त्याच्या मागोमाग बडबडतच राघवही बेडरूमकडे जातो. अंधारात त्यांचं बोलणं ऐकू येतं.)

राघव : आई-वडलांचा चेहेराही मला आठवत नाही धड मला. पण इतक्या वर्षात मला कधी त्यांची आठवणही येऊ दिली नाहीस तू. असला आदर्श भाऊ नाटक- सिनेमातूनही नाहीसा होत चाललाय हल्ली.

सुहास : सकाळी लवकर उठायचंय मला, झोप आता.

राघव : माझ्या डोळ्यासमोर अनिता शहाचा रक्ताच्या थारोळ्यातील मृतदेह येतोय अजून...

सुहास : मग डोळे मिटून घे. ( खेकसत) ती चादर नीट घे अंगावर, का देऊ एक ठेवून...

राघव : झोपतो रे बाबा झोपतो, पण गुड नाईट म्हणू की गुड मॉर्निंग?

सुहास : दॅट्स इनफ नाऊ.

राघव : ओके... ओके...

(अंधार होतो. काही क्षण रातकिड्यांची किरकिर. मग पूर्ण शांतता. काही क्षणांनी प्रकाश उजळतो.)

प्रवेश दुसरा

(सकाळ. साडेआठ वाजलेत. सुहास सारी कामं आवरून पेपर वाचत बसलाय. राघव बाथरूममधूनच ओरडतो.)

राघव : दादाऽऽऽ, एऽऽऽ दादाऽऽऽ

सुहास : काय रे?

राघव : अरे प्लीज जरा टॉवेल दे ना!

सुहास : टॉवेल तिथंच दांडीवर ठेवलाय. नीट बघ!

राघव : (ओरडत) सापडला रे सापडला!

सुहास : (फोन वाजतो. तो उचलत) हॅलोऽऽऽ हां, येस... बरोबर... बरोबर... तो आंघोळ करतोय... मी त्याचा भाऊ बोलतोय - सुहास. आपण?...हां.. हां...बरं बरं-- सांगतो... अच्छा- अच्छा. आणखी काही? बरं... थँक्यू !! (ठेवतो)

राघव : ( केस पुसत बाहेर येतो ) झोप उडाली नाही अजून. साधा टॉवेल दिसला नाही म्हणजे कमाल झाली...

सुहास: ही बातमी वाच म्हणजे झोप उडून जाईल आपोआप!

राघव : (पेपर घेत मोठ्यानं वाचू लागतो, तोवर सुहास त्याच्यासाठी कॉफी आणायला आत जातो.) निष्पाप अनिता शहाचा निर्घृण खून. चार माथेफिरू तरुणांचे अमानुष कृत्य. आरोपीना अटक करण्यात पोलिस अपयशी. (पेपरवरून झरझर नजर फिरवत राहतो. त्याचे डोळे समाधानाने चमकत राहतात. )

सुहास : (कॉफीचा मग पुढे करत) घे!

राघव : तू वाचलीस दादा? माझ्या नावासहित प्रसिद्ध झालेय.

सुहास : पोलिसांवर एवढे कडक ताशेरे उगाच ओढलेस तू.

राघव : म्हणजे काय?

सुहास : अरे गुंडांची नावं, पत्ते सगळी माहिती तपशीलवार दिली होती मी पोलिसांना. संध्याकाळी आयुक्तांशी बोललो. सकाळी आठ वाजता घडलेल्या घटनेतील गुंडाना ते रात्री अकरापर्यंत अटक करू शकले नव्हते मग त्यांच्यावर ताशेरे ओढायचे नाही तर काय करायचं?

सुहास : कॉफी घे. थंड होतेय...

राघव : (घुटका घेतो)

सुहास : फोन आला होता–

राघव : कुणाचा?

सुहास : करंदीकरांचा!

राघव : मला वाटलंच होतं... काय म्हणतोय तो म्हातारा?

सुहास : अभिनंदन केलंय तुझं.

राघव : अस्सं?

सुहास : वर दोन दिवसांची रजा मंजूर केलेय म्हणून सांगा असं म्हणत होते.

राघव : चॅयला कमाल झाली...

सुहास : त्यात कसली कमाल?

राघव : म्हणजे आम्हाला दोन दिवसांची रजा हवी असेल तर अधून-मधून एखाद्या निष्पाप मुलीचा मुडदा पडायला हवा. (हसतो )

सुहास : संपादकानी स्वतःहून रजा दिलेय हे नशीब समज.

राघव : कसली बोडक्याची रजा घेऊन बसलाहेस दादा? मी जर रजेवर गेलो तर ह्या बातमीचा फॉलोअप कोण करणार, त्या संपादकाचा बाप?

सुहास : त्याचं तो बघून घेईल. दोन दिवस रजा मिळालेय तर घरी आराम करत बस. (त्याच्या मागे जाऊन त्याचे केस पुसू लागतो.)

राघव : तू काय मला अगदी कुकुलं बाळ समजतोस काय रे दादा?

सुहास : का?

राघव : घरी आराम काय कर, केस काय पुसतोहेस, आता काजळाचं बोट लावून दृष्ट काढू नको म्हणजे झालं...

सुहास : तेसुद्धा केलंय.

राघव : पण ते लहानपणी. आता मी मोठा झालोय. लग्न केलं तर वर्षात तुला काका करून टाकीन.

सुहास : (हसत) पैज लावतोस?

राघव : कसली? लग्न करण्याची? मी लग्न करतो आणि तू माझी पोरं खेळवत बस. अशानं लोक मला व्हिलन समजतील. म्हणतील देवासारख्या, भावाला स्वतः साठी जन्मभर राबवून घेतला. मी तुला स्पष्टपणे सांगतो दादा, की तुझं लग्न झाल्याशिवाय मी लग्न करणार नाही.

सुहास : आणि माझ्या बायकोनं जर तुला घराबाहेर हाकलून दिला तर?

राघव : ( हात जोडून) तर अगदी उपकार मानीन त्या माऊलीचे.

सुहास : म्हणजे माझ्या लग्नाचा विचार पुढे ढकलावा हेच बरं! (टॉवेल घेऊन गॅलरीत वाळत टाकायला जातो. त्याच्या मागोमाग राघव)

राघव : दादड्या, मेहेरबानी कर पण माझ्यावर असलं निःस्वार्थ वगैरे प्रेम करणं सोडून दे. गुदमरून जातो मी अगदी त्यात! नाटकात बघायला किंवा कादंबरीत वाचायला बरं वाटतं पण अनुभवायला फार कठीण!

सुहास : मूर्खासारखी काहीतरी बडबड करू नको. आईबाबांच्यामागे तुझा नीट सांभाळ करणं हे मोठा भाऊ म्हणून माझं कर्तव्यच होतं. त्यात काही उपकार नाही केले मी तुझ्यावर.

राघव : अरे पण आता मी मोठा झालोय.

सुहास : तुला शिंग फुटलेत तर मनात येईल ते कर. इथे हौस आलीय कुणाला? मलासुद्धा आता रोज हाताने जेवण करून खाण्याचा कंटाळा आलाय. लवकरच तुला वहिनी आणली पाहिजे.

राघव : (विश्वास न बसून) खरं बोलताहेस?

सुहास : अगदी खरं...

राघव : शपथ घे.

सुहास : तुझी शपथ!

राघव : चला म्हणजे आता एखाद्या मुलीचं नशीब उजळणार म्हणायचं. पण बरं का दादा, वहिनी कशी पाहिजे तर 'गोरी गोरी पान, फुलासारखी छान... माडगुळकरांच्या गाण्यातली वहिनी जिवंत होऊन प्रत्यक्षात अवतरलीय असं वाटायला हवं साऱ्यांना...

सुहास : असल्या वहिनीला दीरसुद्धा तसाच चांगला हवा... भावाचं ऐकणारा! अगदी आज्ञाधारक!

राघव : लग्न करणार असशील तर काय वाट्टेल ते ऐकीन मी तुझं.

सुहास : तूर्त दुसरं काहीही नको. दोन दिवस रजा मिळालीय तेवढी घे म्हणजे झालं...

राघव : हात्तिच्या! घेतली रजा पण दोन दिवस घरात बसून काय करू?

सुहास : तुझं ते कवितासंग्रहाचं काम अर्धवट पडलंय ना ते पूर्ण करून टाक. वाटल्यास दोन दिवस खंडाळ्याला जाऊन राहा. नाहीतरी मागे चाललंच होतं तुझं तसं... (दुसरी कल्पना सुचवत) का चिपळूणला जातोहेस आपल्या घरी? घर आहे का वाहून गेलं यांचीसुद्धा काळजी नाही आपल्याला. सदूमामाची किती पत्र आली 'तांदूळ घेऊन जा, तांदूळ घेऊन जा...' तांदूळही घेऊन येशील, घरही पाहशील आणि आपली ती 'ऐतिहासिक' पाच गुंठे जागा कशी दिसते - नेमकी कुठे आहे, तेही बघून येशील (दोघेही हसतात)

राघव : चिपळूणला नको पण खंडाळ्याची आयडिया चांगली आहे. तू सोबत येणार असशील तर आणखी मजा येईल...

सुहास : प्लीज राघव. ऑफिसमध्ये फायलींचा ढिगारा पडलाय. श्वास घ्यायला फुरसत मिळत नाही. लवकरच प्रमोशन मिळणार आहे त्यामुळे विनाकारण साहेबाच्या पाया पडायला लावू नको. चार पैसे हाताशी असल्याशिवाय डबल बेडरूम फ्लॅटचं स्वप्नं कसं काय साकार होईल आपलं? आणि लग्नासाठी पैसा नको?

राघव : दादा, तुला एक विचारू?

सुहास : काय ?

राघव : आजवर तू कधी एका शब्दानंही मला माझ्या पगाराविषयी विचारलं नाहीस...

सुहास : कसं सांगू तुला राघव? फार गरिबीत जगावं लागलं आपल्याला... स्कॉलरशिपवर शिक्षणाचा खर्च केला. पार्टटाईम नोकरी करून पोटाची सोय केली. मनात असूनसुद्धा कधी हौसमौज केली नाही... पैसे उधळणं म्हणजे

काय असतं तेही अनुभवलं नाही... हे सगळं स्वप्न आता मी तुझ्यातून पहातोय. तू म्हणजे मीच आहे असं वाटण्याइतपत बुडून गेलोय मी तुझ्यात.

(फोन वाजतो. राघव जाऊन फोन उचलतो. सुहास कपडे बदलण्यासाठी आत जातो.)

राघव : हॅलो... हं... बरोबर... मीच बोलतोय- बोला... अं? (आवाज चढवत) कोण बोलतंय आपण? काय? हे पहा, मी असल्या फडतूस धमक्यांना भीक घालत नाही... अरे जा जा ! तुझ्यासारखी हलकट माणसं खूप बघितलीत मी. तुला काय करायचंय ते कर रे - बास्टर्ड साला! (फोन आपटतो)

सुहास : ( आतूनच) कोण रे?

राघव : कोणी नाही. रॉंग नंबर लागला. ( फोन उचलून एक नंबर फिरवतो.) हॅलोऽऽऽ शिंदेसाहेब आहेत का? मी राघव बोलतोय. वा- वा- साहेब नमस्कार! अभिनंदन कशाबद्दल? हां... हां... थँक्यू. अहो अशा बातम्या छापणं हे कर्तव्यच असतं आमचं... काही नाही, आज जरा खंडाळ्याला जायचा विचार आला मनात म्हटलं तुमची सेवा घ्यावी... किती वाजता? चालेल... चालेल... अहो दोन सीट नको एकच हवी. (मोठ्याने हसत फोन ठेवतो)

सुहास : ( ऑफीसचे कपडे करून बाहेर येत ) काय झालं?

राघव : डेपो मॅनेजरला फोन केला होता. दोन सीट ठेवू का विचारत होता. त्याला वाटलं मी खंडाळ्याला हनीमूनसाठी जातोय. (दोघेही हसतात.)

सुहास :  कितीची गाडी आहे?

राघव : अकराची.

सुहास : तुझं सर्व नीट आवर. जेवण सकाळीच करून ठेवलंय मी. जेवल्याशिवाय बाहेर पडू नको, पोचल्यावर तिथनं फोन कर मी वाट पाहतो... (खिशातून पाकिट काढतो आणि काही नोटा काढून त्याला देत) हे ठेव.

राघव : अरे पण...

सुहास : तुझ्याकडे पैसे आहेत हे माहीताय मला पण तरीही ठेव. कदाचित उपयोगी पडतील. नाहीतर आल्यावर परत कर. निघतो मी. जाताना नीट कुलुप लावून घे आणि चावी शेजारी आंबुर्लेमावशींकडे दे.

(राघव सुहासला सोडायला दारापर्यंत जातो. सुहास खाली उतरून गेल्यावर त्याला काहीतरी आठवतं. तो धावत किचनमध्ये जातो. सुहासचा टिफिन घेऊन धावत गॅलरीत येतो आणि वरून हाक मारतों)

राघव : दादा - एऽऽऽ दादा–

सुहास : ( खालूनच ) काय रे?

राघव : अरे यार तुझा डबा इथेच विसरून गेलास ना ! हा घे. टाकू इथनंच? नीट कॅच करायचा हं? समज, की मी तेंडुलकर आहे आणि तू शोएब अख्तर. मी एक जोरदार फटका मारणार आहे आणि तू कॅच घेऊन मला आऊट करणार आहेस. हं... घे... शाऽऽऽ ब्बास... ॲण्ड ॲट लास्ट आय ॲम आऊट... राघव इज आऊट (मोठ्याने हसतो. हसता हसता अंधार)

प्रवेश तिसरा

( तिसऱ्या दिवशीची रात्र. राघव अद्याप घरी परतलेला नाही म्हणून सुहास अस्वस्थपणे येरझारा घालतोय. मध्येच तो फोनकडे जातो. फोन लावतो पण राँग नंबर लागतो. पुन्हा नंबर फिरवतो.)

सुहास : हॅलो ऽऽऽ करंदीकर आहेत का? मी सुहास बोलतोय. राघवचा भाऊ... हं. द्या जरा त्याना... नमस्कार करंदीकरसाहेब... मी सुहास बोलतोय. राघवचा भाऊ. राघव परवा सकाळी खंडाळ्याला गेलाय तो अजून परतला नाही. एव्हाना परत यायला हवा होता. फोन नाही की काही निरोपही नाही. मोबाईल हरवून बसलाय. त्या अनिता शहा प्रकरणाच्या धावपळीत... म्हटलं तुम्हाला काही कल्पना असली तर विचारून पाहावं. कदाचित तुमच्याशी संपर्कात असेल असं वाटलं... नाही तसं काही विशेष नाही. काहीही निरोप न ठेवता अचानक गायब होण्याची जुनीच सवय आहे त्याची पण यावेळी सांगून गेला होता आणि त्यामुळंच काळजी वाटतेय थोडी. बरं.. बरं ठिकाय. तुम्हाला जर फोन आला तर प्लीज कळवा मला. थँक्यू... अच्छा, गुड नाईट !! ( फोन ठेवतो अस्वस्थपणे येरझारा घालत राहतो. काही क्षणानी फोन वाजतो. अधीरपणे फोन उचलून हॅलो हॅलो करतो पण पलीकडून काहीच रिस्पॉन्स येत नाही. तसाच फोन ठेवतो. पुन्हा रिंग येते–)

सुहास : हॅलोऽऽऽ कोण राघव का रे?

आवाज : म्या हवालदार पाटील बोलतोय.

सुहास : कोण हवालदार पाटील? कोण हवंय तुम्हाला?

आवाज : राघव तुमचाच भाऊ नव्हं का?

सुहास : हो... होय... पण कुठनं बोलताय तुमी?

आवाज : म्या आर. जे. हास्पिटलमधनं बोलतोय. तुमच्या भावाला आडमिट केलाय हितं ...

सुहास : काय?

आवाज : व्हय की!

सुहास : पण झालं काय त्याला ? कसा आहे तो?

आवाज : आत्ताच सुद्दीवर आला... तुमचं नाव घेत व्हता. तुमीच सुवास नव्हं का?

सुहास : हो मीच सुहास...

आवाज : सुद्दीवर आल्यावर तुमचा नंबर दिला. तुमी ताबडतोब हास्पीटलमधी या !

सुहास : पण काय झालंय तरी काय त्याला?

आवाज : मारून कुनीतरी घाटात फेकून दिला व्हता. मुका मार बराच लागलाय. तसं काय घाबरन्याचं कारन न्हाय पन तोंडावर आशीड मारलंय त्याच्या. तुमी लवकर या. सारखं तुमचं नाव घेतोय त्यो !

सुहास : तोंडावर ॲसिड मारलंय? (भेदरून फोन खाली ठेवत) राघव काय नशिबी आलं रे हे तुझ्या! (दरवाजाकडे

धावतो. अंधार.)

प्रवेश चौथा

(सकाळ. पंधरा दिवस उलटून गेलेत. राघवला घरी आणलेले आहे. बाहेरच्या खोलीत येण्याची त्याला भीती वाटते म्हणून तो किचनमध्येच बसून राहणे पसंत करतो. ॲसिडमुळे त्याच्या चेहेऱ्याचा अर्ध्याहून अधिक भाग होरपळून विद्रूप झालेला आहे. सुहास बाहेरच कपड्यांना इस्त्री करत बसलाय. काम करता करता हाक मारतो.)

सुहास : राघव एऽऽऽ राघव...

राघव : (उत्तर देत नाही.)

सुहास : ( मोठ्याने) राघऽ व...

राघव : ( आतूनच खिडकीचा पडदा सरकवून बाहेर पाहत) काय रे दादा. काय म्हणतोस?

सुहास : बाहेर ये की जरा. ऊन किती छान पडलंय बघ. लहानपणी सकाळच्या कोवळ्या उन्हात आपली सावली पकडण्याचा खेळ खेळायचो आपण ते आठवतय ना तुला?

राघव : नको रे दादा, ती आठवण काढू. प्लीज...

सुहास : अरे, पण बाहेर तरी ये!

राघव : मला उजेडाची भीती वाटते रे दादा...

सुहास : मग आणखी किती दिवस त्या अंधाऱ्या कोपऱ्यात बसून राहणार आहेस?

राघव : जोवर मरत नाही तोपर्यंत!

सुहास : (उठतो आणि आत जात) तुला किती वेळा सांगितलं की असं अभद्र बोलत जाऊ नकोस म्हणून? हा नको तो भोग तुझ्या वाट्याला आला हे खरं आहे पण त्यामुळं जगण्याला काहीच अर्थ उरला नाही असं मानायचं का? अजून खूप जगायचंय तुला, नाव मिळवायचय, मोठं व्हायचंय. चल बाहेर ये... मी इस्त्री करतोय तोवर बोलत बसू आपण.

( सुहास राघवला धरून बाहेर आणतो. दाराच्या चौकटीत जेव्हा राघव येतो तेव्हा बाहेरचा प्रकाश जणुकाही एकजीव होऊन विजेसारखा त्याच्या चेहेऱ्यावर कोसळतो. तो प्रकाश सहन न होऊन डोळ्यांवर हात घेत राघव किंचाळतो.)

राघव : अरे, नको रे नको दादा... मला हा प्रकाश सहन होत नाही... मला पुन्हा त्या अंधाऱ्या खोलीत जाऊ दे... सोड दादा सोड मला... मला धरून ठेव रे दादा... मला धरून ठेव... ते आले रे आले, दादा... सोडा मला... धावा रे धावा, वाचवा कुणीतरी... आई गं मेलो... वाचवा रे वाचवा, दादा... दादा... ते मला ठार मारतील, मला धरून ठेव दादा... कुठाहेस रे कुठाहेस तू दादा? (रडू लागतो)

सुहास : (त्याला थोपटत) हा काय मी इथंच आहे. कोण मारतंय तुला? इथं तर कोणीही नाही. नुसते भास होताहेत तुला. शांत हो पाहू... शांत हो. ये इकडे बैस... बैस येथे... अस्सा... (राघवला सोफ्यावर बसवताना सुहास आपल्या

डोळ्यातले अश्रू टिपतो ते पाहून)

राघव : दादा तू रडतोस?

सुहास : नाही रे राजा, डोळ्यात काहीतरी गेलं...

राघव :  खोटं बोलतोहेस तू, दादा.

सुहास : (डोळे पुसत) हो, आयुष्यात पहिल्यांदा रडलो आज. काळीज फाटून गेलं... एकमेकांच्या सावलीत वाढतो आपण. सुखदुःख समसमान वाटून घेतली पण आता हे काय भलतंच आलं रे तुझ्या वाट्याला? तुझा हा विद्रूप झालेला चेहेरासुद्धा अर्धा वाटून घेता आला असता मला तर किती बरं झालं असतं! प्लीज राघव, सावर स्वतःला. तू स्वतःला सावरणं म्हणजे एका अर्थी माझ्याच आयुष्याला आधार मिळण्यासारखं आहे.

राघव : कधी कधी तुझा चांगुलपणा इतका उफाळून येतो की तुझा संशय यावा!

सुहास :  (त्याच्याकडे चमकून पाहत) म्हणजे?

राघव : खरं तर या अवस्थेत मलाच तुझ्या आधाराची गरज आहे. पण माझ्या मनात परावलंबित्वाची भावना निर्माण होऊ नये म्हणून तू मुद्दाम असं उलटं बोलताहेस. ही तुझी नेहमीची पद्धत आहे. मी कसला रे आधार देणार तुला? घुबडासारखं अंधारात आयुष्य काढणं नशिबी आलं!

सुहास : असं का म्हणतोहेस? चांगली बुद्धिमत्ता आहे तुझ्याजवळ, नोकरी आहे! परवाच करंदीकर येऊन गेले. तुझ्यासाठी मुख्यमंत्र्यांना भेटले ते. तुझ्यावर हल्ला करणारे आणि अनिता शहाचा खून करणारे गुंड एकाच टोळीतील आहेत याचे पुरावे मिळालेत पोलिसांना. लवकरच गजाआड जातील ते सगळे. तुला कामावर हजर व्हायला सांगितलंय त्यानी. तुला पटत असेल तर दुसरी नोकरी बघू आपण. नियमितपणे लिहीत राहिलास तरी स्वतःच्या पायावर उभा राहू शकशील तू. आणि हो–

राघव : काय?

सुहास : थोडे पैसे साठले की प्लॅस्टिक सर्जरीचं ऑपरेशन करून घेऊ आपण.  तुझं पूर्वीचं रूप आपण पुन्हा मिळवू शकतो. अमेरिकेत जाण्याइतकी आपली ऐपत असती तर आत्ताच जाऊन आलो असतो... पुढं मागं तोही प्रयत्न करू. माझ्यावर विश्वास ठेव. आणखी काय हवंय तुला?

राघव :  (एकदम हळवा होत) गुंडानी माझ्यावर अमानुष हल्ला केला त्या क्षणापूर्वी माझ्या चेहेऱ्यावरून गेलेली वाऱ्याची आल्हाददायी झुळूक आणि तो प्रसन्न क्षण हवाय मला.  झोपेतून उठल्यावर असं ओंजळीत पाणी घेऊन चेहेऱ्यावर मारताना जी एक विलक्षण गंमत वाटायची ती हवीय मला.  माझ्या चेहेऱ्याचं मऊसूत कातडं तुझ्या काजळबोटाच्या स्पर्शानं पुलकित होऊन उठायचं, ती शिरशिरी देशील पुन्हा मिळवून? बघ दादा, तुझ्यात जर हिम्मत असेल तर बघ एकदा माझ्या चेहेऱ्याकडे निरखून. माझ्या ह्या भयानक, भेसूर चेहेऱ्याकडे बघून साक्षात मृत्यूसुद्धा जवळ यायला थरथरा कापेल माझ्या. का म्हणून असा भयंकर सूड उगवला नियतीनं माझ्यावर? काय गुन्हा केला होता मी कुणाचा? एका निष्पाप पोरीवर झालेल्या अन्यायाच्या बाजूनं उभा राहिलो हा माझा गुन्हा की तुझ्यासारख्या निष्कपट भावाच्या पाठीवर पाय देऊन जन्माला आलो हा गुन्हा? ज्या अनिता शहाला गुंडानी भोसकली आणि माझ्या तोंडावर ॲसिड फेकलं तिचा आणि माझा काय पूर्वसंबंध होता? ज्या अनिताला तिच्या आईवडिलानी सोळा-सतरा वर्षे फुलासारखी वाढवली तिला काहीही संबंध नसणाऱ्या मवाल्यानी क्षणार्धात का

खुडून टाकावं? देशील या प्रश्नांची उत्तरं?

सुहास : ( त्याच्या पाठीवर हात ठेवून त्याला धीर देत) आपलं आयुष्य म्हणजे नियतीचा एक प्लॅन असतो राघव. 'डिव्हाईन प्लॅन'! आपण असतो फक्त त्यातली बाहुली. आपल्या पुढ्यात नियती ज्या भूमिकेचा तुकडा फेकते तो आपण उचलायचा आणि निमूटपणे जगत राहायचं इतकंच आपल्याला हाती असतं. तुझी भूमिका ऑलरेडी तुझ्या वाट्याला आलेली आहे आणि यू हॅव टू ॲक्सेप्ट इट...

राघव : (घड्याळाचा गजर होते. राघव उठून गजर बंद करत) घड्याळ कधीचं नादुरुस्त झालंय. नको तेव्हा गजर देतं... भंगारमध्ये फेकूनही देत नाहीस आणि दुरुस्तही करून आणत नाहीस.

सुहास : उद्या ऑफिसला जाताना आठवण कर. टाकतो दुरुस्तीला.

राघव : उद्या ऑफिसला जाणार तू?

सुहास : हो. जायलाच हवं. साहेबांचा दोनदा निरोप आला. शिवाय आता तू हिंडाय- फिरायलाही लागलाहेस...

राघव : घरात एकट्याला करमणार नाही मला.

सुहास : तुझ्यासाठी भरपूर पुस्तकं आणून ठेवलीत. कॅसेटही भरपूर आहेत. तुझी आवडती गाणी ऐक. नुसता टीव्ही बघत बसलास तरी वेळ कसा जाईल हे कळणारही नाही तुला... हळूहळू सवय करायला हवी आता... आंबुर्लेमावशी आज सकाळीच आल्यात गावाहून. त्या येतील दुपारी गप्पा मारायला तुझ्याशी. ओके?

राघव : ओके!

सुहास : आणखी एक गंमत आहे!

राघव : कसली गंमत?

सुहास : परवा वाढदिवस आहे तुझा. आहे ना लक्षात?

राघव : तू आठवण करून दिलीस म्हणून आठवला.

सुहास : ह्या वर्षी धमाल करू आपण. गिफ्ट काय आणू सांग बरं?

राघव : आण तुला वाटेल ते! एखादा रिकामा खोका आणून दिलास तरी चालेल!

सुहास : रिकामा खोका?

राघव : त्यात तुझं प्रेम आहे असं समजून त्या आधारावर पुन्हा उभा राहीन मी. (सुहास राघवला जवळ घेऊन थोपटत राहतो. अंधार)

प्रवेश पाचवा

( दुसऱ्या दिवशीची दुपार. रेडिओवर गाणं सुरू आहे. राघव सोफ्यावर पडलेला. उठतो आणि गाणं बंद करतो. टीव्ही ऑन करून विविध चॅनलची बटणं दाबतो. एका चॅनलवर 'खून- बॉम्बस्फोटा'च्या बातम्या सुरू आहेत. तो वैतागून टीव्ही बंद करतो. मग काही पुस्तकं काढून चाळायला लागतो. इतक्यात फोन वाजतो. राघव फोन उचलतो.

फोनवर एक गुंड राघवला धमकावतो आहे. )

आवाज : हॅलोsss हॅलोsss

राघव : कोण बोलतंय?

आवाज : वळखलं नाहीस काय रे भाड्या?

राघव : (किंचित तापत) कोण बोलतंय?

आवाज : मस्ती जिरलेली दिसत न्हाय तुझी अजून...नावं छापलीस काय रे भडव्या पोरांची?

आवाज : हे बघा तुम्ही कोणीही असा, अशी गुंडगिरी करून विचार स्वातंत्र्याचा गळा घोटू शकत नाही तुम्ही... कायद्याचं राज्य आहे इथं...

आवाज : कायद्याचं राज्य गेलं फोकनाळीत त्येच्या आयला. त्यो करंदीकर सीएमना भेटला जाऊन... त्याला म्हणावं बंद कर आमच्या बातम्या छापणं नायतं रस्त्यात पेट्रोल वतून जाळू भडव्याला!

( फोन कट होतो. राघव फोन ठेवतो. वरून शांत पण आतून विचलित झालेला. येऊन पुन्हा पुस्तकात मन घालण्याचा प्रयत्न करू लागतो. इतक्यात बेल वाजते. राघव वाचनाच्या तंद्रीतून तसाच खुर्ची मागे ढकलून उठतो, दरवाजाकडे जायला वळतो पण पुढच्याच क्षणी त्याची पावलं थबकतात. त्याला आपल्या चेहेऱ्याची आठवण झालेली असते. तो जागेवरच घोटाळतो. बेल पुनः पुन्हा वाजत राहाते. अखेर मनाचा हिय्या करून तो दरवाजा उघडतो, बाहेर डोकावतो. त्याला पाहून बाहेरून आंबुर्लेमावशींची किंकाळी ऐकू येते. त्या बाहेरच्या बाहेर पळून जातात. अपघातानंतर प्रथमच त्यांनी राघवला पाहिलेले असते. राघव दरवाजा बंद करतो आणि भेलकांडत सोफ्याकडे येतो. मावशींच्या किंकाळ्या एकामागून एक मेंदूत घुसत असल्यागत घायाळ होऊन तो सोफ्यावर पडतो. अंधार. )

प्रवेश सहावा

( प्रकाश. दोन दिवसानंतरची संध्याकाळ. राघव सोफ्यावर पडलाय. एक हात खाली लोंबकळतोय. दरवाजाची बेल वाजते. एकदा-दोनदा तिनदा. राघवची काहीच प्रतिक्रिया नाही. बाहेरून दारावर आता थपडा पडू लागतात आणि 'राघव राघव' अशा सुहासच्या हाका ऐकू येऊ लागतात. जीवाच्या आकांताने सुहास हाका मारत आहे. आणि राघव दचकून जागा होतो. सुहासच्या हाका त्याला ऐकू येतात. तो तसाच धावत जातो आणि दरवाजा उघडतो. सुहास हातातले पार्सल टेबलावर ठेवून गर्भगळीत झाल्यासारखा सोफ्यावर बसतो. त्याची अवस्था राघवच्या लक्षात येते.)

राघव : आय ॲम सॉरी, दादा. कधी डोळा लागला ते समजलंच नाही. झोपसुद्धा इतकी गाढ लागली होती की मी जणू काही मेल्यातच जमा झालो होतो.

सुहास : प्लीज राघव... झालं तेवढं खूप झालं. मला पुनःपुन्हा ते शब्द ऐकवू नको. एवढं कसलं तुला मरणाचं आकर्षण निर्माण झालंय? आणि तू मेल्यावर माझी काय स्थिती होईल याचा विचार केलाहेस कधी तू?

राघव : रिअली सॉरी, दादा...

सुहास : क्षमा मागण्याची सवयच लागलीय तुला. परवा मूर्खासारख्या झोपेच्या गोळ्या घेतल्यास. जीव तळहातावर घेऊन काढली ती रात्र. तेव्हासुद्धा 'रिअली सॉरी' असं म्हणाला होतास. का मला इतका छळतोहेस तू? आणि तुला

जर मरण्याची इतकी हौस आलीय तर मला का नाही आधी विष आणून देत?

राघव : ( पश्चातापाने त्याच्या पायाशी बसत ) नाही रे, दादा. प्लीज, असं निराश झाल्यासारखा बोलू नकोस. आकाश फाटलं तरी त्याच्यावर उभा राहून जगण्याची तयारी असलेल्या तुझ्या तोंडी शोभून नाही दिसत ते. मला कळतंय की मी तुला त्रास देतोय. पण मी तरी काय करू? एकाकीपणा मला अगदी खायला उठतो. आणि हा माझा चेहेरा तर माझा दुष्मनच झालाय... तो जितका विसरण्याचा प्रयत्न करावा तितका अटळपणे आठवत राहतो. कधी कधी अगदी अनावर होतं आणि तोल जातो माझा... पण आता यापुढे तुला त्रास होईल असं काहीही करणार नाही मी. काळजावर दगड ठेवून जगेन पण माझ्या लाडक्या दादाला छळणार नाही कधी. मला माफ कर... मला तुझ्या पंखात घेरे दादा (हुंदके देत रडू लागतो.)

सुहास : (त्याला थोपटत) असं रडायचं नाही. आज वाढदिवस आहे ना तुझा !

राघव : हो खरंच की ! विसरलोच होतो मी! काय बथ्थड झालंय डोकं...

सुहास : डोकं बथ्थड वगैरे काहीही झालेलं नाही उलट असं क्षणिक विस्मरण माणसाच्या बुद्धीमत्तेचंच लक्षण असतं.

राघव : वाईटातून चांगलं काढण्याचा हा तुझा चांगुलपणा!

सुहास : हरभऱ्याच्या झाडावर चढवू नकोस. तुला काय भेट आणलेय ओळख पाहू!

राघव : मला फक्त तुझं प्रेम हवंय असं म्हणालो होतो मी.

सुहास : तेच आणलंय... बघ तरी उघडून.

( राघव वर्तमानपत्राच्या कागदात बांधलेले ते पुडके अधीरतेने सोडतो. आतला खोका बाहेर काढतो. खोका उघडून पाहतो तर आत जुईच्या फुलांचा गजरा. तो पाहून राघव खुश होतो. गजरा श्वासात भरून घेत–)

राघव : यू आर रिअली जिनियस दादा. किती चांगला आहेस रे तू ! या क्षणी मला कसली गरज आहे हे अगदी नेमकं ओळखलस... (पुन्हा गजरा श्वासात भरून घेत) तू जर मुलगी असतास ना यार...

सुहास : तर काय केलं असतंस?

राघव : तर... तर तू माझी ताई झाला असतास. (दोघेही खळखळून हसतात.)

सुहास : (आत जात) वॉश घेतो जरा, जेवायला बाहेरूनच मागवू आज.

राघव : (ओरडत) कॉफी करू नको रे. मी मघाशीच करून ठेवलीय थर्मासमध्ये. हवी असली तर घेऊन ये. मीही घेईन थोडी ( राघवचं लक्ष खाली पडलेल्या वर्तमानपत्राच्या पानाकडं जातं. सहज म्हणून तो ते पान उचलतो आणि चाळायला लागतो. एका विशिष्ट ठिकाणी बारकाईने वाचू लागतो. पुनः पुन्हा वाचतो. पार्श्वभूमीवर एखादी मोहक सुरावट वाजू लागते... प्रकाशही मंद तीळसर होऊन पाझरू लागतो. वाचता वाचता राघवाचे डोळे एका अनामिक ओढीनं चमकू लागतात. वाचता वाचताच तो मनाशी एक निर्धार करू लागलेला असतो. सुहास कॉफीचे दोन मग घेऊन बाहेर येतो आणि त्याची तशी तंद्री लागलेली पाहून...)

सुहास : काय कविता बिविता वाचतोहेस की काय एखादी एवढं तन्मय होऊन?

राघव : ( त्या तंद्रीतच )

सुहास : ब्लडी पोयेट... घे. (राघव यांत्रिकपणे कॉफीचा मग हातात घेतो पण त्याचं लक्ष अजूनही त्या पानातच.) काय वाचतोहेस एवढं?

राघव : जाहिरात!

सुहास : ( अपेक्षाभंगानं हसत) अरे जाहिरात ही काय वाचण्याची गोष्ट असते का? एखाद्या सुंदर पोरीचा फोटोबिटो छापला असेल तिथं. बघू ( पेपर घेतो) कुठंय-काय?

राघव : ती रे ती... वरती चौकटीत छापलेय ती.

सुहास : कोणती? ही ? (मोठ्यानं वाचत) 'चारूला मित्र हवा' ही?

राघव : हो. तीच.

सुहास : (हसत) ‘मित्र पाहिजे’ ही काय जाहिरात झाली? लोकपण काय एकेक जाहिराती देतात कुणास ठाऊक!

राघव : हसू नको, पूर्ण वाचून तर बघ.

सुहास : (मोठ्यानं वाचतो) 'चारूला मित्र हवा!  ही जाहिरात तुमच्या आयुष्याला कलाटणी देऊ शकते. पत्राने त्वरित संपर्क साधा: पोष्ट बॉक्स नंबर अडतीस तेहतीस' (पेपर राघवच्या अंगावर फेकत ) रिकामपणाची कामगिरी आहे कुणाचीतरी झालं... कॉफी घे!

राघव : ही जाहिरात कुणीतरी मनापासून दिली असेल असं नाही वाटत तुला?

सुहास : कसली मनापासून? चावटपणा दिसतोय कुणाचातरी...

राघव : कशावरून चावटपणा?

सुहास : कशावरून नाही?

राघव : कारण ती वाचत असताना आत आत कुठंतरी झंकारल्यासारखं झालं मला. कोणीतरी साद घालतंय असं वाटलं...

सुहास : आण तो कागद इकडं, कचऱ्याच्या टोपलीत फेकून देतो.

राघव : पण माझी मनोदेवता मला सांगतेय की ही जाहिरात खरी आहे.

सुहास : बरं बाबा, खरी तर खरी. पण कोण तो चारू का फारू त्याच्याशी काय करायचंय आपल्याला?

राघव : आपण एक गंमत करू.

सुहास : कसली गंमत?

राघव : आपण तिला एक पत्र पाठवू.

सुहास : 'तिला'?

राघव : हाय कम्बख्त तूने पी ही नही. अरे 'तिला' म्हणजे त्या चारूला.

सुहास : ओह आय सी!  म्हणजे इथे 'तो' चारू नसून 'ती' चारू आहे तर...

राघव : आत्ता ट्यूब पेटली तुझी!

सुहास : पण काय रे, चारू म्हणजे 'ती' च असेल कशावरून? 'तो' का नाही ? चारुदत्त, चारूहास?  नाही म्हणजे इथे तसा काहीच उल्लेख नाही म्हणून म्हटलं...

राघव : तो चारुदत्त असूदे किंवा चारुलता असूदे आपण एक चान्स घेऊन बघायचा. 'ती' समजून पत्रं लिहायचं. काय सांगावं कदाचित खरंच आयुष्याला कलाटणी मिळायची.

सुहास : तुला काय करायचंय ते कर. मी फोन करून जेवणाची ऑर्डर देतो.

राघव : असा कसा रे तू अगदीच भावड्या? अरे आयुष्यात काहीतरी थ्रील पाहिजे असं नाही वाटत तुला?

सुहास : मी काय करावं असं तुझं म्हणणं आहे?

राघव : आपण चारूला पत्र लिहायचं...

सुहास : ठीक आहे तू पत्र लिही, तोवर मी फोन लावतो.

राघव : असं नाही... म्हणजे मी जरी पत्र लिहिणार असतो तरी तू मला मदत करायची! प्रेमपत्र लिहायचं म्हणजे त्यासाठी तुझ्यासारखा प्रेमळ भाऊ नको मदतीला?

सुहास : दॅट्स इनफ नाऊ. तुझ्या ह्या मूर्खपणात मला सहभागी होता येणार नाही. उगाच काहीतरी भानगड मागे लागायची.

राघव :  ठीक आहे मला आज जेवायचं नाही.

सुहास : अरे असं काय करतोस खुळ्यासारखा? आज वाढदिवस आहे ना तुझा?

राघव :  वाढदिवस गेला खड्डयात!

सुहास : ( हात जोडतो. टेबलावरचे पॅड आणि पेन उचलून त्याच्याकडे देत) हे घ्या एकदाचं, आणि काय ते लिहून मोकळे व्हा...

राघव : मायना काय लिहू?

सुहास : लिही– राजमान्य राजश्री चारू यांस...

राघव : ( काकुळतीने) असं काय करतोस रे दादड्या? सांग ना कशी करायची सुरुवात ते! तुला माझी शपथ!

सुहास : (विरघळून प्रेमळपणे) 'प्रिय चारू,

(राघव लिहू लागतो. तसा अन्यत्र अंधार. राघववर रिमझीम प्रकाश. तसंच पाझरणारं हळुवार संगीत. राघव मोठ्याने बोलत पुढचं लिहू लागतो...)

राघव : चारू... तझं नाव किती सोपं. सुटसुटीत आणि अर्थपूर्ण आहे चारू! त्याच्या नुसत्या उच्चारानं एखादी सुगंधी वाऱ्याची झुळूक अंगावरून जावी तसं वाटतं. एखादी अल्लड, भाबडी चारुगात्री साक्षात उभी ठाकावी अशी जादू आहे त्या दोन अक्षरात. या अक्षरांची फुलपाखरं झाली आणि हळुवारपणे काळजावर येऊन बसली तर किती बरं होईल...

तिचा आवाज : प्रिय राघव, दोन ओळींच पत्र पाठवलंस पण किती बोलकं. एखादी कळी सहजगत्या फुलत जावी तसं... प्रत्येक शब्द उलगडत जाणाऱ्या पाकळीसारखा. पत्राच्या अखेरीस, फुललेलं फुल ओंजळीत यावं तसं 'तुझा राघव'... आता या फुलाचं काय करू? तुझी चारू.

राघव : प्रियतम चारू, तुझं पत्रं मिळालं. काळजावरून मोरपीस फिरलं. पण तुला कसं सांगू? तुझ्यात आणि माझ्यात कोणतं वादळ घोंघावतंय? कुठून ऐकू येतेय ही गाज आणि हे कोणत्या लाटांचे आवाज? दूर क्षितिजापाशी प्राण पणाला लावून कोण वल्हवतंय आपली होडी आणि विशाल निळ्या आकाशातून पंख मिटून कोणतं पाखरू मारतंय सूर तिच्या दिशेनं? ...तुझा राघव!

तिचा आवाज : प्रिय राघव,

'हर्षखेद हे मावळले, हास्य निमाले अश्रू पळाले

कंटकशल्ये बोथटली, मखमालीची लव वठली

काही न दिसे दृष्टीला, प्रकाश गेला - तिमिर हरपला

काय म्हणावे या स्थितीला?

झपूर्झा गडे झपूर्झा... -

राघव : प्रिय चारू,

'जग समाधिस्त जणू सर्व सर्व हे होते

परि शांती लेशही नव्हता ठाऊक तूते

बैसून कुठेतरी काटेरी झुडुपात

तव हू-हू-हू चे होते गीत वाहत

येईल एक परी धन्य दिवस सौख्याचा

जो करील तुझ्यासह अंत तुझ्या गीताचा.'

तिचा आवाज : प्रियतम राघव, तुझ्या पत्रातील वैफल्याचा सूर पाहून जीव कासावीस झाला. का रे असं लिहिलंस?

का असा उदास उदास झालास? का असा जखम वाहू लागावी तसा व्याकुळ झालास? पत्र लिहिता लिहिताच उत्तराची प्रतीक्षा करायला सुरुवात करणारी– तुझीच चारू.

राघव : चारू माझ्या जीवा, तुला कसं सांगू कोणती चिरंजीव जखम घेऊन जगतोय मी अश्वत्थाम्यासारखा! जीवनाच्या 'डिव्हाईन प्लॅन'मधली एक अटळ भूमिका आलेय वाट्याला जी जगतोय काळजावर दगड ठेवून! माझ्या वाट्याला आला होता मूठभर प्रकाश पण तोही एकाएकी लुटून नेला कुणीतरी. सोसाट्याच्या वादळासारखा कोसळतोय अंधार आणि त्यातच देतंय मला कोणीतरी निर्णायक आदेश, माझ्या वाट्याला आलेली अटळ भूमिका निमूटपणं सादर करण्याचा. भूमिकेच्या हातातील बाहुलं झालेला... राघव.

तिचा आवाज : प्रिय राघव,

भूमिकेमध्ये शिरायचं असतं

पण वाहून जायचं नसतं

भूमिकेच्या हातातलं बाहुलं व्हायचं नसतं...

भूमिका म्हणजे बुरखा असतो

मोहाचा विळखा असतो

त्यात अडकून पडायचं नसतं

भूमिकेच्या हातातलं बाहुलं व्हायचं नसतं...

भूमिका म्हणजे झोका असतो

काही क्षणांचा आभास असतो

त्यात घरटं बांधायचं नसतं

भूमिकेच्या हातातलं बाहुलं व्हायचं नसतं....

-तुझी तुझी तुझीच चारू.

(अंधार)

प्रवेश सातवा

(पंधरा दिवसानंतरची संध्याकाळ. राघव विमनस्कपणे बसलेला. दारावरची बेल वाजते. तो अनिच्छेने उठतो. दरवाजाशी जाऊन 'कोण आहे?' असं विचारतो. 'मी सुहास' असं उत्तर आल्यावर दरवाजा उघडतो आणि तसाच मुकाटपणे येऊन सोफ्यावर बसतो.)

सुहास : काय म्हणतेय तुझी चारू? आजही आलं नाही ना पत्र? म्हणजे तिचं पत्र न येण्याचा आज पंधरावा दिवस... मी आधीपासून सांगत होतो तुला की हा कुणाचा तरी चावटपणा आहे म्हणून. पण तुला पटलं नाही. उगाच शब्दांचे बुडबुडे फोडत बसलास आणि त्यात गुंतून पडलास. ( राघव काहीच बोलत नाही म्हणून जवळ जाऊन त्याला

थोपटत) गेले पंधरा दिवस मी हेच सांगतोय तुला राघव. अजूनही मागं फिरता येईल.

राघव : मागं फिरलो असतो दादा पण परतीचा रस्ता आता धुक्यात हरवून गेलाय.

सुहास : खुळ्यासारखं काहीतरी बोलू नको. तर्काच्या लखलखीत उन्हात ये. सारं काही स्वच्छपणे दिसू लागेल.

राघव : प्रत्येकाचा तर्क हा वेगवेगळेपणा असतो दादा. माझा तर्क मला सांगतोय की चारू आहे. असायला हवी. असणारच ती!

सुहास : सगळा तुझ्या कल्पनेचा खेळ आहे. तिच्याकडं आपण किती वेळा तिचा फोन मागितला, दिला का तिनं? आपल्या नंबरवर फोन कर म्हणून कळवलं केला का ?

राघव : पण माझ्याकडं पत्रं आहेत तिची.

सुहास : अशी पत्र कोणताही खुळचट माणूस लिहू शकेल.

राघव : पत्रं लिहील पण फोटो पाठवू शकणार नाही.

सुहास : म्हणजे?

राघव : आज पुन्हा तिचं पत्र आलंय आणि नुसतंच पत्र नाही तर सोबत फोटोही पाठवलाय तिनं, हा बघ– ( दाखवतो)

सुहास : ( पाहत) ओ माय गॉड. (क्षणभर सुहास स्वतःतच हरवून जातो. तसे संगीत.)

राघव : कशी आहे?

सुहास : सुंदर. मनाचा ठाव घेणारी. पहाताक्षणीच कुणालाही आवडावी अशी...पण खरंच कारे ही चारू असेल? की कोणी काही जीवघेणा खेळ खेळतंय आपल्याशी?

राघव : ही चारूच आहे दादा. माझं अंतर्मन सांगतंय मला. ज्या क्षणी तिचं पहिलं पत्र आलं त्या क्षणीच तिच्याविषयीचा विश्वास जागृत झाला माझ्या मनात.

सुहास : तू म्हणतोस त्या प्रमाणे ही जर खरंच चारू असेल तर काय करायचं रे पुढं आता?

राघव : शो मस्ट गो ऑन, दादा!

सुहास : प्लीज राघव... विचार कर ही अखेरची संधी आहे असं वाटतंय मला. पुढच्या खेळाची सूत्रं आपल्या हाती राहणार नाहीत. ह्या खेळात एकदा का चारूची एण्ट्री झाली की आपलं चिमुकलं विश्व भुईसपाट होऊन जाईल. प्लीज तिला कळव की तुला पत्रं लिहिणारा राघव नावाचा कुणी माणूस अस्तित्वातच नव्हता...

राघव : मी स्वतः तुझ्या समोर उभा असताना तिला कळवायचं की राघव नावाचा माणूस अस्तित्वात नव्हता? नाही दादा, आता माघार घ्यायची नाही.

सुहास : पण मग करायचं तरी काय?

राघव : विचार करून मार्ग काढायचा दादा. त्यासाठी मला तुझ्या मदतीची गरज आहे. आणखी एक गोष्ट लक्षात घे.

सुहास : काय?

राघव : तिनं मला माझाही फोटो पाठवायला सांगितलाय आता...

सुहास : त... तुझा, फ, फोटो ? ओ माय गॉड! मी पाय धरतो तुझे राघव पण प्लीज आता ह्या खेळात तू अधिक अडकू नकोस आणि मलाही अडकवू नकोस.

राघव : ( किंचित आक्रमक होत ) दादा आय हॅव अक्सेप्टेड माय रोल ॲज यू हॅव अडव्हाईस्ड अँड यूवर डायरेक्शन इज ऑल्सो मस्ट. दॅटीज यूवर रोल टू...

(सुहास असाहाय्य. घड्याळाचा गजर होतो. दोघंही तिकडं पाहतात. गजर जोरात सुरूच आहे.

"भूमिकेमध्ये शिरायचं असतं

पण वाहून जायचं नसतं

या कवितेचं आता गाणं झालंय. ते कानावर पडत असतानांच हळूहळू पडदा. )

**मध्यंतर**

***

(सूचना : या नाटकाची पूर्ण संहिता प्राप्त करून घ्यावयाची असल्यास वेबसाईटमध्ये दिलेल्या पत्त्यावर संपर्क करावा.

या नाटकाचे सर्व हक्क लेखकाकडे राखीव आहेत. प्रयोगापूर्वी लेखकाची परवानगी घेणे बंधनकारक आहे. या नाटकाचे भाषांतर, रूपांतर, त्यावर आधारित चित्रपट, चित्रमालिका, वेब-सिरीज, त्याचे अभिवाचन, यूट्युब/फेसबुकवरील किंवा कोणत्याही प्रकारच्या माध्यमातून पूर्ण किंवा अंशत:  असा कोणत्याही प्रकारचा आविष्कार करण्यापूर्वी, तसेच त्याचे चित्रिकरण, ध्वनिमुद्रण इत्यादी करण्यापूर्वी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे.)

***